## आरोग्य् विभाग, जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत भरारी पथकांसाठी मानसेवी वैद्यकिय अधिकारी पदांसाठी जाहिरात

================================================================

म.अतिरिक्त् संचालक, आरोग्य् सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य् पुणे-१ जा.क्र.राकुकका/कक्ष-१०अ/भरारीपथक मार्गदर्शक सुचना/२०२०-२१/२०६६८-७१०(अ) /२०२० दिनांक ०३/०४/२०२० अन्वये नाशिक जिल्हा परिषद आरोग्य् विभागाअंतर्गत आदिवासी भागातील अतिसंवेदनशील दुर्गम भागात विशेष आरोग्य् सेवा पुरविण्यासाठी भरारी पथकांना मान्यता देण्यांत आली आहे. यापूर्वीचे मंजुर ५३ भरारी पथकांपैकी १८ रिक्त् जागा आहे. सदरहु मानसेवी वैद्यकिय अधिकारी पदांच्या खालील रिक्त् जागा भरावयाच्या आहेत.

| अ. क्र. | तालुका | भरारी पथकाचे रिक्त् ठिकाण | अंतर्गत प्रा.आ. केंद्राचे नांव | अ. क्र. | तालुका | भरारी पथकाचे रिक्त् ठिकाण | अंतर्गत प्रा.आ. केंद्राचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बागलाण | सावरपाडा | केळझर | १० | सुरगाणा | मांधा | पांगारणे |
| २ | पेठ | मानकापुर | कोहोर | ११ | सुरगाणा | आमझर | उंबरठाण |
| ३ | पेठ | आडगांव | भुवन | १२ | सुरगाणा | राशा | उंबरठाण |
| ४ | पेठ | खामशेत | भुवन | १३ | त्र्यंबकेश्वर् | डोलओहोळ | चिंचओहोळ |
| ५ | पेठ | एकदरा | करंजाळी | १४ | त्र्यंबकेश्वर् | पांगुळघर | ठाणापाडा |
| ६ | सुरगाणा | खिर्डी | बा-हे | १५ | त्र्यंबकेश्वर् | खरवळ | शिरसगांव |
| ७ | सुरगाणा | कळमणे | बा-हे | १६ | त्र्यंबकेश्वर् | सावरपाडा | मुलवड |
| ८ | सुरगाणा | आवळपाडा | पळसण | १७ | त्र्यंबकेश्वर् | कौलपोंडा | मुलवड |
| ९ | सुरगाणा | सुळेवांगण | पळसण | १८ | त्र्यंबकेश्वर् | शिवाजीनगर | रोहिले |

वरील मानसेवी वैद्यकिय अधिकारी पदावर काम करण्याची इच्छा असलेल्या इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज, शैक्षणिक अर्हतेच्या, अनुभवाच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सह समक्ष दिनांक ६ /७/२०२० सायंकाळी ५.०० वा. पावेतो आरोग्य् विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद नाशिक येथे सादर करावेत. मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घेण्यांत यावी

**शैक्षणिक अर्हता** : बी.ए.एम.एस.अर्हताधारक उमेदवार

**मानधन** : आदिवासी क्षेत्रामध्ये साथरोग ,कुषोष्ण व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याकरीता फिरत्या आरोग्य् पथकाकरीता आदिवासी विभागाकडुन प्रतिमाह रु.६०००/- मानधनावर व एन.एच.एम.मंजूर निधीतून रु.१८०००/- असे एकुण रु.२४०००/- (अथवा शासनाने वेळोवेळी केलेल्या बदलांनुसार)

वरीलप्रमाणे पदे ही शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या खालील अटी व शर्तीनुसार भरण्यांत येणार आहेत.

१) मानसेवी वैद्यकिय अधिकारी या पदासाठी उमेदवार हा बी.ए.एम.एस.अर्हताधारक असावा.

२) मानसेवी ही नोकरी नसुन आदिवासी विभागातील काम करण्यासाठी मानसेवी व्यक्ती आहे. या अनुषंगाने निवड झालेल्या मानसेवी वैद्यकिय अधिकारी यांना मानसेवी असल्याबाबत रु. १००/- च्या स्टॅम्प् पेपरवर अटी व शर्तीचे हमीपत्र लिहुन व नोंदवुन देणे बंधनकारक राहील.

३) मानसेवी वैद्यकिय अधिका-याला मुख्यालयी रहणे बंधनकारक राहील.

४) असमाधानकारक काम करणा-या व मुख्यालयात न राहणा-या मानसेवी वैद्यकिय अधिका-यास कामावरुन कमी करण्याचे अधिकार मुख्य् कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना राहतील.

५) यापुर्वी मानसेवी वैद्यकिय अधिकारी म्हणून समाधानकारकरित्या कामकाज केलेल्या उमेदवारांना प्राधान्य् देण्यांत येईल.

६) सदर पदे ही निव्वळ् तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांचा कार्यकाळ दिनांक ३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात येईल. त्यानंतर या पदावर सबंधित उमेदवारास कोणताही धारणाधिकार राहणार नाही याची सबंधितांनी नोंद घ्यावी.

७) रिक्त् पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो.

( डॉ.कपिल प्रकाश आहेर)
जिल्हा आरोग्य् अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

लीना बनसोड (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक